# कथा

## चतुर कारभारी[दिवाणजी]

आजुक त्यानं आपल्या शिष्यांय्लें म्हतलं,कोण्या एका धनवान् माणसाचा, एक कारभारी [दिवाणजी] होता,अन् लोकाईनं धनवान माणसाच्या पासी जाऊन, त्याच्या कारभाऱ्यावर हा आरोप लावला,कि हा तुह्यावाली सारी संपत्ति गमावून टाकू रायला हाय.तवा त्यानं त्याच्यां कारभाऱ्यालें बलाऊन म्हणलं,तुह्यावाल्या बद्दल म्या काय आयकू रायलो हाय.? तू आपल्या कारभारी पणाचा हिशोब कितोब दे ;कावून कि तू आतां कारभारी रायणार नाई.तवा तो कारभारी आपल्या मनांत विचार करते,आता म्या काय करू? कावून कि माह्यालां घरधनी आता कारभारी पणाचं काम माह्यापासून हिसकावून घेऊ रायला हाय,माती त.. मले खणतां येत नाई,अन् भीक मांग्याची लाज वाटते.पण आता मले सुचलं कि काय करावं,जवा मी कारभारी पणाच्या कामावरून काढला जाईन,पण लोकायन मले आपल्या घरांत घ्यावं.तवा त्यानं आपल्या धन्याच्या देणेकऱ्याय्लें एकाएकाले बलावून,पयल्याले त्यानं विचारलं कि तुह्याल्या इकडे माह्यावाल्यां धन्याचं काय काय येतें.तवा तो म्हणें,शंभर मण तेल,तवा त्यानं त्यालें म्हतलं,तुह्याली खातावही घे अन् बसून लवकर पन्नास लिवून ठेवं.मंग अजुक त्यानं दुसऱ्यालें म्हतलं,तुह्यावर काय काय येतें?तो म्हणें,शंभर मण गहू,तवा त्यानं त्यालें म्हणलं,तुह्याली खातावही घेऊन अस्सी लिवून ठेवं.हे पाऊन घरधन्यानं त्याअधर्मी कारभाऱ्याची वाहवा केली,कावून कि त्यानं चतुराईन काम केलं हाय,कावून कि ह्या संसाराचे लोकं आपल्या काळाच्या रितीनं व्यहारात प्रकाशाच्या लोकांयपेक्षा हुशार असतात.आणखी म्या तुमाले सांगतो,अनीतीच्या धनानं आपल्या साठी मित्र बनवा,यासाठी कि जवा ते नाहीसें होतीन तवा ते तुमाले सर्वकालच्या वस्त्यांमध्ये घ्यावें.अन् जो थोड्यातल्या थोड्यात खरा हाय,तो बऱ्याचं विषयी खरा हाय,अन् जो थोड्यातल्या थोड्यात अधर्मी हाय, तो बऱ्याचं विषयी अधर्मी हाय.म्हणून तुमी जर अधर्माच्या धनात खरे नसाल, तवा तुमाले खरं धन कोण सोंपवून देईन.अन् जर तुमी दुसऱ्याच्या धनात खरे नाई ठरले,तवा जे तुमचं हाय,ते तुमाले कोण देईन?कोणताही दास दोन स्वामीची सेवा नाई करू शकत, कावून कि तो एकाचा राग करीन,अन् दुसऱ्यावर प्रेम करीन,नाईतर एका संग मिडून राईन,अन् दुसऱ्याले तुच्छ मानीन,तुमाले देवाची अन् धनाची दोनांची सेवा करता येत नाई.अन् परुशी जे धनाचे लोभी होते ते ह्या सऱ्या गोष्टी आयकू रायले होते,अन् त्याची थठ्ठा करत होते.तवा त्यानं त्यांय्लें

म्हणलं,तुमी माणसांयच्या समोर स्वताले धर्मी करता,पण देव बाप तुमचे मन ओळखते,कावून कि जे गोष्टी माणसाच्या नज्रीत महान हायत,त्या देवाच्या नज्रीनं घृणित हायत.नियमशास्त्र अन् भविष्यवक्ता योहाना परेंत रायले,त्याचं वाक्ती पासून देवाच्या राज्यांचा सुसमाचार सांगतला जात हाय,अन् हरएक झन प्रभलतानं अंदर जाऊन रायला हाय.आकाश अन् पृथ्वीचं मिटून जाणं, नियमशास्त्राच्या एका बिंदूच्या मिटून जाण्याच्या पेक्षाहि सोफं हाय अन् जो कोणी आपल्या बायको ले सोडून दुसरी संग लग्नं करते,तो व्यभिचार करते,अन् जो कोणी नवर्‍यानं टाकून देलेल्या बाई संग लग्नं करते,तो पण व्यभिचार करते ,